Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 1st SEPTEMBER 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर यांनीं तारीख २२ माहे एप्रिल सन १८९८ रोजीं मंजूर केला आणि आली जनाब व्हैसरॉय व गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं तारीख १४ माहे जूलै सन १८९८ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं छापून प्रसिद्ध केला असे.

### सन १८९८ चा मुंबईचा आक्ट ३ रा.

(सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट सुधारण्यासाठीं आक्ट).

( या आक्टास हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांनीं दिलेली मंजुरी मुंबईचे गव्हर्नर साहेब बहादुर यांनीं तारीख ३ माहे आगस्ट सन १८९८ रोजीं प्रसिद्ध केली असे. )

ज्या अर्थीं सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट, यांत खालीं सांगितलेल्या रीतीनें, सुधारणें योग्य आहे; त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट, ज्यास यांत पुढें सदरहू आक्ट असें ह्मटलें आहे, त्याच्या १ ल्या कलमाच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे :— १ ल्या कलमाची सुधारणूक.

" १. (१) या आक्टास सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट असें ह्मणावें. लहान सरनामा.

"(२) तो, मुंबई शहर, सिंध व एडन हीं शिवायकरून सगळ्या मुंबई इलाक्यास लागू आहे, परंतु मुंबई सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून तो किंवा त्याचा कोणताहि भाग सिंध किंवा एडन याच्या कोणत्याहि भागास कोणत्याहि वेळीं लागू करण्यास सरकार मुखत्यार आहे. " व्याप्ति.

२. सदरहू आक्टाच्या २ ऱ्या कलमांत " पोट-कलम (१) " या शब्दांच्या व आंकड्याच्या ऐवजीं " पोट-कलम (२) " हा मजकूर दाखल करावा. २ ऱ्या कलमाची सुधारणूक.

कलम २५, पोट-कलम २, याची सुधारणूक.

३. सदरहू आक्टाचें कलम २९, पोट-कलम (२) याच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

"(२) अशा जादा पोलिसाचा खर्च, सरकार तसें फर्मावील तर, सर्वांशीं किंवा अंशतः, यांत खालीं सांगितलेल्या मनुष्यांवर पट्टी बसवून, अगर अशा मनुष्यांच्या मालमत्तेवर कर आकारून, किंवा ती पट्टी व तो कर हीं दोन्ही सदरहूप्रमाणें बसवून व आकारून आणि

(अ) असा जाहिरनामा ज्या प्रदेशास लागू असेल त्या प्रदेशांतील रहिवाशी असणाऱ्या सगळ्या मनुष्यांपासून साधारणपणें घेऊन, किंवा

(ब) अशा मनुष्यांच्या कोणत्याहि विशिष्ट भागापासून किंवा भागांपासून अथवा वर्गापासून किंवा वर्गांपासून विशेष प्रकारें घेऊन,

भागविला पाहिजे, आणि अशी पट्टी किंवा कर हीं कोणत्या प्रमाणांनीं घ्यावीं तें फर्माविण्याचा सरकारास अधिकार आहे.

खुलासा.—या कलमाच्या व कलम २९ अ याच्या कारणांसाठीं 'रहिवाशी' या शब्दांत, जे मनुष्य स्वतः होऊन किंवा आपल्या गुमास्त्यांच्या अगर नौकरांच्या द्वारें अशा प्रदेशांतील जमिनीचा किंवा इतर स्थावर मिळकतीचा भोगवटा करीत असतील अगर तशी जमीन किंवा स्थावर मिळकत धारण करीत असतील ते, व जे जमीनदार स्वतः होऊन किंवा आपल्या गुमास्त्यांच्या अगर नौकरांच्या द्वारें अशा प्रदेशांतील प्रत्यक्ष रयतेपासून किंवा भोगवटा करणारांपासून भाडें किंवा महसूल जमा करीत असतील ते त्या प्रदेशांत खरोखर रहात नसले तथापि, त्यांचा समावेश होतो असें समजावें."

२९ व्या कलमांत नवीन पोट-कलम (३) दाखल करणें.

४. सदरहू आक्टाचें कलम २९, पोट-कलम (२), याच्यानंतर खालीं सांगितलेलें नवीन पोट-कलम दाखल करावें व त्यास (३) हा नंबर द्यावा, ह्मणजे :—

"(३) अशी पट्टी किंवा कर देण्याची मुदत, असें जादा पोलीस ज्या मुदतीपर्यंत खरोखर ठेविलें असेल त्या मुदतीबाहेर, कोणत्याहि बाबतींत पांच वर्षांहून जास्त नाहीं इतक्या अवधीपर्यंत वाढविण्याचा सरकारास अधिकार आहे.

कलम २९, पोट-कलम (३) याची सुधारणूक.

५. सदरहू आक्टाच्या २९ व्या कलमाच्या (३) ऱ्या पोट-कलमाच्या ऐवजीं खालील पोट-कलम दाखल करावें आणि त्यास (४) हा नंबर द्यावा, ह्मणजेः—

"(४) सदरहू प्रकारची पट्टी बसविणें ती किंवा सदरहू प्रकारचा कर आकारणें तो, म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट खेरीज करून इतर ठिकाणीं, कलेक्टरानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें बसविली पाहिजे किंवा आकारला पाहिजे. ज्या प्रदेशांत अशी कोणतीहि पट्टी बसवावयाची असेल किंवा असा कोणताहि कर आकारावयाचा असेल तो प्रदेश म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असल्यास, त्या खर्चाची रकम तेथील म्युनिसिपालिटीनें म्युनिसिपल फंडांतून दिली पाहिजे, किंवा तो कर, पोट-कलम (२) अन्वयें सरकार जो हुकुम करील त्याबरहुकुम, म्युनिसिपालिटीनें आकारला पाहिजे."

२९ व्या कलमांत नवीन (५) वें पोट-कलम दाखल करणें.

६. सदरहू आक्टाच्या २९ व्या कलमाच्या नवीन (४) थ्या पोट-कलमानंतर खालीं दिलेलें नवीन पोट-कलम दाखल करावें, ह्मणजे :—

"(५) कोणत्याहि मनुष्यांस अशा खर्चाचा कोणताहि भाग सोसण्याच्या पात्रतेंतून, हुकुम करून, वगळण्याचा सरकारास अधिकार आहे."

नवीन कलम दाखल करणें.

७. सदरहू आक्टाच्या २९ व्या कलमानंतर खालीं दिलेलें नवीन कलम दाखल करावें, ह्मणजे :—

गैरकायद्याच्या मंडळीनें केलेल्या नुकसानीचा मोबदला कसा वसूल करावा.

"२९ अ. (१) सरकारची पूर्वी मंजूरी घेऊन जिल्हा माजिस्ट्रेट हा—

(अ) त्यास जरूर वाटेल ती चौकशी केल्यानंतर,

(१) एकाद्या गैरकायदेशीर मंडळीचा सामान्य हेतु शेवटास नेण्याच्या कामीं केलेल्या कोणत्याहि कृत्यामुळें कोणत्याहि मालमत्तेस झालेल्या कोणत्याहि तोट्याच्या किंवा खराबीच्या संबंधानें, अगर कोणत्याहि मनुष्यास किंवा मनुष्यांस आलेल्या मरणाच्या किंवा झालेल्या मोठ्या दुखापतीच्या संबंधानें, कोणत्याहि मनुष्याला किंवा मनुष्यांना नुकसानीचा मोबदला ह्मणून किती रकम द्यावी असें त्याला वाटेल ती रकम ठरविण्यास, आणि

(२) कोणत्या प्रदेशांतील रहिवाशांनीं आपल्या वर्तनाच्या योगानें अशी मंडळी भरविली आहे किंवा भरण्याच्या कामीं मदत केली आहे असें त्यास वाटेल तो प्रदेश ठरविण्यास, मुखत्यार आहे;

(ब) याप्रमाणें ठरविलेली रकम, सदरीं सांगितल्याप्रमाणें ठरविलेल्या प्रदेशांतील सर्व रहिवाशांपासून अगर तशा मनुष्यांच्या कोणत्याहि भागापासून किंवा भागांपासून अथवा वर्गापासून किंवा वर्गांपासून, जिल्हा माजिस्ट्रेट तशीच मंजुरी घेऊन हुकुम करील त्या प्रमाणांनीं, वसूल करण्याविषयीं कलेक्टरास सांगण्यास मुखत्यार आहे;

(क) असा प्रदेश म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असल्यास, त्याच्या नजरेस येईल त्याप्रमाणें पट्टी किंवा कर बसवून अशी रकम आकारण्याविषयीं व वसूल करण्याविषयीं म्युनिसिपालिटीस सांगण्यास मुखत्यार आहे; आणि ती पट्टी किंवा तो कर म्युनिसिपालिटीनें, अशा हुकुमांस अनुसरून, सदरहू प्रमाणांनीं सदरहू मनुष्यांवर बसवून त्यांजपासून वसूल केला पाहिजे; आणि

(ड) याप्रमाणें वसूल केलेला सगळा किंवा कोणताहि पैसा, सदरीं सांगितल्या प्रकारच्या तोट्याच्या किंवा खराबीच्या अगर मरणाच्या किंवा मोठ्या दुखापतीच्या संबंधानें ज्या कोणत्याहि मनुष्यास किंवा ज्या कोणत्याहि मनुष्यांस नुकसानीचा मोबदला मिळण्याचा हक्क आहे असें जिल्हा माजिस्ट्रेटास वाटेल त्या मनुष्यास देण्याविषयीं किंवा त्या सर्व अगर कोणत्याहि मनुष्यांना वांटून देण्याविषयीं प्रसंगाप्रमाणें कलेक्टरास किंवा म्युनिसिपालिटीस सांगण्यास मुखत्यार आहे.

(२) अशा नुकसानीच्या मोबदल्याचा कोणताहि भाग देण्याच्या पात्रतेंतून कोणत्याहि मनुष्यास, हुकुम करून, वगळण्याचा सरकारास अधिकार आहे.

(३) सदरीं सांगितल्याप्रमाणें घडलेल्या मरणाच्या, मोठ्या दुखापतीच्या, तोट्याच्या किंवा खराबीच्या संबंधानें जो दावा सांगण्यांत आला असेल तो दावा त्या मरणाच्या, मोठ्या दुखापतीच्या, तोट्याच्या किंवा खराबीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत सांगण्यांत आल्याशिवाय, व नुकसानीच्या मोबदल्यासाठीं दावा सांगणारा मनुष्य सदरीं सांगितल्याप्रमाणें घडलेलें मरण, मोठी दुखापत, तोटा किंवा खराबी ज्या गोष्टींमुळें घडली त्या गोष्टींच्या संबंधानें निर्दोषी आहे अशी जिल्हा माजिस्ट्रेटाची खात्री झाल्याशिवाय, या कलमाअन्वयें कोणताहि पैसा वसूल करतां कामा नये व कोणताहि नुकसानीचा मोबदला देतां कामा नये.

(४) पोट-कलम (१)अन्वयें जिल्हा-माजिस्ट्रेटानें केलेला प्रत्येक ठराव, आकार व हुकुम हे, सरकाराकडून किंवा या बाबतींत सरकार वेळोवेळीं ज्या अमलदारास अधिकार देईल त्या अमलदाराकडून तपासले जाण्यास पात्र असतील, परंतु एवढें खेरीज करून इतर प्रकारें ते अखेरचे असतील असें समजावें.

(९) ज्याच्याबद्दल या कलमाअन्वयें नुकसानीचा मोबदला दिलेला असेल तशा कोणत्याहि तोट्याच्या किंवा नुकसानीच्या संबंधानें कोणताहि दिवाणी दावा चालणार नाहीं असें समजावें."

२६ व्या कलमाची सुधारणूक.

८. (१) सदरहू आक्टाच्या २६ व्या कलमाच्या (१) ल्या पोट-कलमांत,—

(अ) "आकारलेला प्रत्येक कर" व "तो कर द्यावयास" या शब्दांच्या ऐवजीं अनुक्रमें "बसाविलेली प्रत्येक पट्टी किंवा आकारलेला प्रत्येक कर" व "ती पट्टी किंवा तो कर द्यावयास" हे शब्द दाखल करावे.

(ब) "गेल्या शेवटल्या कलमाखालीं" या शब्दांच्या ऐवजीं "गेल्या शेवटल्या दोन कलमांअन्वयें" हे शब्द दाखल करावे;

(क) सदरहू पोट-कलम (१) याच्या शेवटीं खालीं लिहिलेला मजकूर ज्यास्त वाढवावा, ह्मणजे :—

"मात्र हमेश असें ठरविलें आहे कीं अशा पट्टीची किंवा कराची वसूली न झाल्यास, ती पट्टी आपणच बसाविली होती किंवा तो कर आपणच आकारला होता असें समजून कलेक्टरानें ती पट्टी किंवा तो कर, खालील पोट-कलमांत ठरविलेल्या रीतीनें, वसूल करावा असें फर्माविण्याचा सरकारास अधिकार आहे."

(२) त्याच कलमाच्या (२) ऱ्या पोट-कलमांत,—

(अ) "आकारलेला प्रत्येक कर, तो देण्यास" या शब्दांच्या ऐवजीं "बसाविलेली प्रत्येक पट्टी किंवा आकारलेला प्रत्येक कर किंवा वसूल करावयाची प्रत्येक रकम हीं, तीं देण्यास" हे शब्द दाखल करावे.

(ब) "वसूल केला पाहिजे" या शब्दांच्या ऐवजीं "वसूल केलीं पाहिजेत" हे शब्द दाखल करावे.

नवीन कलम दाखल करणें.

९. सदरहू आक्टाच्या २६ व्या कलमानंतर खालीं दिलेलें नवीन कलम दाखल करावें, ह्मणजे :—

गेलीं तीन कलमें सिंधांत लागू केल्याचा परिणाम.

"२६ अ. सदरील शेवटलीं तीन कलमें सिंध प्रांतांत अमलांत आल्यावर, त्यांशीं सन १८६७ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट याच्या १६ व्या व १७ व्या कलमांतील ठराव जेवढ्या अंशीं जुळत नसतील तेवढ्या अंशीं ते त्या प्रांतांत रद्द झाले आहेत असें मानलें पाहिजे."

४२ व्या कलमाची सुधारणूक.

१०. सदरहू आक्टाच्या ४२ व्या कलमाच्या (१) ल्या पोट-कलमांत, "गाणीं गाणें" या शब्दांच्या नंतर खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

"वाद्यें वाजविणें,"

४८ व्या कलमाची सुधारणूक.

११. सदरहू आक्टाच्या ४८ व्या कलमाचें पोट-कलम (१), रकम (अ), यांत "जाणाऱ्या मंडळ्यांच्या, मिरवणुकींच्या आणि जमून जाणाऱ्या लोकांच्या अगर मेळ्यांच्या वर्तनाविषयीं" या शब्दांच्या ऐवजीं "जाणाऱ्या मंडळ्या, मिरवणुकी आणि जमून जाणारे समुदाय अगर मेळे यांतील मनुष्यांच्या वर्तनाविषयीं आणि वागणुकीविषयीं किंवा कृत्याविषयीं" हे शब्द दाखल करावे.

आलीजा नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर यांच्या हुकमावरून,

(सही) सी. जी. एच्. फासेट,

मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.